## थोडक्यात...


### मराठी शिक्षक महासंघाच्या वतीने कु.जयश्री पाटीलचा गुणगौरव सोहळा संपन्न



(सचिन रायपत्रीवार/दै.धर्मयोध्दा)

**शिरुर** - महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,पुणे यांनी घेतलेल्या इयत्ता बारावी बोर्ड परीक्षेत,शारदा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यामंदिर,वरुड (बु.)ता.भोकरदन जि.जालना येथील कु.जयश्री देविदास पाटील या विद्यार्थिनीने मराठी विषयात १०० पैकी ९९ गुण घेऊन महाराष्ट्र राज्यातून प्रथम क्रमांक मिळविला.एक प्रकारे तिने छत्रपती संभाजीनगर विभागाच्या शिरपेच्यात मानाचा तुरा रोवला आहे.कु.जयश्री पाटीलचे इ.५ वी ते १२ वी पर्यंतचे शिक्षण ग्रामीण भागातील वरूड (बु.)या छोटेशा खेडेगावात झाले असून तिने मराठी विषयात ९९ गुण प्राप्त करून संपूर्ण महाराष्ट्रात लौकिक प्राप्त केला आहे.ही बाब मराठवाड्यासाठी भूषणावह आहे.मराठी भाषेचा झेंडा अटकेपार नेणाऱ्या कु.जयश्री देविदास पाटील हिच्या यशाचा गुणगौरव करण्यासाठी कनिष्ठ महाविद्यालयीन मराठी शिक्षक महासंघाने वरुड (बु.)येथे प्रत्यक्ष घरी जाऊन कु.जयश्री पाटील,तिची आई प्रा.सौ.मनीषा पाटील,वडील डॉ.देविदास भगवानराव पाटील यांचा शाल,बुके व सन्मानचिन्ह देऊन यथोचित गुणगौरव केला.या गुणगौरव सोहळ्या प्रसंगी मराठी शिक्षक महासंघाचे अध्यक्ष माननीय प्रा.सुनील डिसले (बारामती),कार्याध्यक्ष डॉ.मनीषा रिठे(वर्धा),राज्य समन्वयक तथा मुख्य नियमक डॉ.राजेंद्र सोनवणे (जालना)व नागपूर जिल्हाध्यक्ष प्रा.सुरेश नखाते,वर्धा जिल्हाध्यक्ष प्रा.गिरीश काळे,बीड जिल्हाध्यक्ष डॉ.आत्माराम झिंजुर्डे इत्यादींनी मनोगतातून कौतुक व अभिनंदन केले आणि पुढील शिक्षणासाठी भरभरून शुभेच्छा दिल्या.याप्रसंगी कु.जयश्रीचे सर्व कुटुंबीय,शाळेतील सर्व शिक्षक,पदाधिकारी,प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते

### सुर्यकांतेश्वर महाराज (बाबा) यांच निधन



(बाळासाहेब मस्के/दै.धर्मयोध्दा)

**चारठाणा**- येथील रहिवासी व सोलगव्हाण स्थित सुर्यकांतेश्वर मंदिराचे संस्थापक गुरुवर्य प.पु शिव सुर्यकांतेश्वर महाराज यांचे शिवैक्य झाले असून त्यांचा समाधी सोहळा रविवार १७ मे रोजी रविवार सकाळी १०वाजता श्री क्षेत्र सोलगव्हाण येथे झाला.या वेळी हजारोंच्या संख्येने भाविक उपस्थित होते.त्यांच्या पश्चात एक मुलगा, दोन मुली, नातवंडे असा परिवार आहे.

### मोफत ड्रोन पायलट प्रशिक्षण ग्रामिण युवक युवती साठी मोठी संधी




(मधुसूदन सोनवळकर/दै.धर्मयोध्दा)

**बीड**- महाराष्ट्र शासनाच्या अमृत ( महाराष्ट्र संशोधन ऊन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी ) मार्फत बीड येथे १० दिवशीय ड्रोन प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे खुल्या प्रवर्गातील आर्थिक दुर्बल घटक प्रवर्गांतील तरुणांसाठी ही प्रशिक्षण कार्यशाळा असून १२ वी उत्तीर्ण १८ ते ५५ वर्ष वयोगटातील ऊमेदवार व ज्यांचे वार्षिक ऊत्पन्न ८ लक्ष पेक्षा कमी आहे अशाच ऊमेदावारास या प्रशिक्षण योजनेत सहभाग घेता येईल ईच्छुकांनी ऑन लाईन अर्ज महाराष्ट्र शासनाच्या www.mahaamrut.org.in या संस्केत स्थळावरून भरावेत ड्रोन प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण करणारांना नागरी हवाई संचालनालया मार्फत ड्रोन पायलट शासकिय परवाना प्रमाणपत्र दिले जाणार आहे या प्रशिक्षणात शेती पायाभूत सुविधांचे प्रशिक्षण तसेच फोटोग्राफी आणि आपत्ती व्यवस्थापन विषयक तांत्रिक कौशल्य दिले जाणार आहे बेरोजगार युवक युवतींनी या प्रशिक्षणाचा लाभ घ्यावा तसेच जास्तित जास्त ग्रामीण शेतकरी युवकांनी या साठी पुढे यावे या साठी जिल्हा स्थरावर हा प्रशिक्षण कार्यक्रम अमृत मार्फत हाती घेण्यात आला आहे

# बोराळवाडीतील बहिष्कार प्रकरण तापले

## आरोपींना तात्काळ अटक करा, पीडितांना जीवनावश्यक वस्तू द्या; अन्यथा २५ मे रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर तीव्र आंदोलनाचा इशारा

(महेंद्र पुरी/दै.धर्मयोध्दा)

**हिंगोली**- हिंगोली । तालुक्यातील बोराळवाडी येथे अनुसूचित जाती-जमाती तसेच आदिवासी व बौद्ध समाजावर सामाजिक बहिष्कार टाकल्याचा गंभीर आरोप करत नॅशनल दलित मूव्हमेंट फॉर जस्टिस (एनडीएमजे) संघटनेने प्रशासनाकडे तातडीने कारवाईची मागणी केली आहे. आरोपींना त्वरित अटक करून पीडित कुटुंबांना जीवनावश्यक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अन्यथा दि. २५ मे रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.



एनडीएमजे चे मराठवाडा प्रदेशाध्यक्ष जगदीप वसंतराव दिपके यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी, पोलिस प्रशासन व समाजकल्याण विभागाकडे हे निवेदन सादर करण्यात आले. अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल निवेदनानुसार, दि. १२ मे २०२६ रोजी गावातील परसराम कचरू ठाकरे यांच्या फिर्यादीवरून काही व्यक्तींविरुद्ध अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत तसेच भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मात्र संबंधित आरोपी अद्याप फरार असून त्यांना अटक करण्यात आलेली नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. बहिष्कार टाकून किराणा, पाणी व दूध बंद केल्याचा आरोप गावातील काही व्यक्तींनी संगनमत करून आदिवासी व बौद्ध समाजावर बहिष्कार टाकल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. संबंधित समाजातील नागरिकांना किराणा दुकानातून सामान देण्यास नकार देण्यात आला, तसेच दूध व पाणीपुरवठाही बंद केल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. यामुळे पीडित कुटुंबांवर उपासमारीची वेळ आल्याचे सांगत त्यांना तात्काळ पिण्याचे पाणी, किराणा साहित्य व अन्य जीवनावश्यक वस्तू उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे. खोटा गुन्हा दाखल केल्याचाही आरोप अत्याचाराचा गुन्हा दाखल केल्यानंतर संबंधित तक्रारदारांवर दबाव आणण्यासाठी विरोधकांनी खोटी फिर्याद देऊन प्रतिगुन्हा दाखल केल्याचा आरोपही निवेदनात करण्यात आला आहे. दोन्ही प्रकरणांचा तपास एकाच अधिकाऱ्यामार्फत करण्यात यावा, अशी मागणी संघटनेने केली आहे. ही घटना गंभीर स्वरूपाची असून सामाजिक तणाव वाढण्याची शक्यता असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे गावात कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिस बंदोबस्त तैनात करावा, तसेच वरिष्ठ अधिकाऱ्यांनी गावाला भेट द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. प्रशासनाने मागण्यांवर तातडीने कार्यवाही न केल्यास दि. २५ मे २०२६ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय हिंगोली समोर तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा एनडीएमजे पदाधिकाऱ्यांनी दिला आहे. या निवेदनावर एनडीएमजे चे विविध पदाधिकारी व स्थानिक नागरिकांच्या स्वाक्षऱ्या असून, सामाजिक बहिष्काराच्या या प्रकरणामुळे परिसरात खळबळ उडाली आहे. निवेदना वेळी बोराळवाडी गावातील बहिष्कार टाकलेल्या कुटुंबातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अंत्योदय आणि एकात्म मानववादाचा विचार घराघरात पोहोचवा-माजी मंत्री डॉ.भागवत कराड



(महेंद्र पुरी/दै.धर्मयोध्दा)

**हिंगोली**- भारतीय जनता पक्ष हा केवळ सत्तेसाठी चालणारा पक्ष नसून तो एका विशिष्ट विचारधारेवर आधारलेला पक्ष आहे. पंडित दीनदयाल उपाध्याय यांनी मांडलेला अंत्योदय आणि एकात्म मानववाद हाच आमच्या कार्याचा मुख्य गाभा आहे. प्रत्येक कार्यकर्त्यांने ही विचारधारा आणि केंद्र सरकारच्या जनकल्याणकारी योजना घराघरात पोहोचवाव्यात असे प्रतिपादन माजी केंद्रीय अर्थराज्यमंत्री डॉ. भागवत कराड यांनी केले. हिंगोली येथे आयोजित भाजपा कार्यकर्त्यांच्या प्रशिक्षण कार्यशाळेत ते समारोपीय भाषणात ते बोलत होते. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर संघटनात्मक बांधणी अधिक मजबूत करण्यासाठी या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी डॉ. कराड पुढे म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने गेल्या अकरा वर्षांत समाजातील शेवटच्या घटकापर्यंत विकास पोहोचवण्यासाठी अनेक महत्त्वाच्या योजना राबविल्या आहेत. विरोधकांकडून होणारा अपप्रचार खोडून काढण्यासाठी कार्यकर्त्यांनी तंत्रज्ञान आणि सोशल मीडियाचा प्रभावी वापर करावा आणि प्रत्येक बुथ स्तरावर पक्षाची ताकद वाढवणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. या कार्यशाळेत माजी जिल्हाध्यक्ष नितीन भुतडा,प्रदेश प्रवक्ता विनोद वाघ,भाजप नेते किरण पातुरकर,मराठवाडा संयोजक मनोज पांगरकर,प्रदेश प्रवक्ता किशोर शितोळे यांनी विविध तांत्रिक आणि राजकीय विषयांवर कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले.या प्रसंगी खासदार रामराव वडकुते,आमदार तान्हाजीराव मुटकुळे, आमदार डॉ. प्रज्ञाताई सातव, माजी आमदार तथा जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे, जिल्हा संयोजक फुलाजीराव शिंदे, माजी जिल्हाध्यक्ष बाबाराव बांगर,उज्वलाताई तांभाळे शिवाजीराव मुटकुळे यांच्यासह जिल्ह्यातील प्रमुख पदाधिकारी आणि मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.

### गंगा दशहरा सप्ताहनिमित दुधना नदी स्वच्छता अभियान
### स्वछता ,प्रदूषणमुक्त , नदीसाठी प्रतिज्ञा , मानसन्मान सेवा रूजु



(गणेश सवणे/दै.धर्मयोध्दा)

**सेलू**- तालुक्यातील मोरेगाव येथील दुधना नदी स्वच्छता अभियान राबविण्यात आले श्री स्वामी समर्थ सेवा व अध्यात्मिक विकास मार्ग ( दिंडोरी प्रणित ) महेश नगर व ग्राम अभियाना अंतर्गत गंगा दशहरा स्वच्छता अभियान दुधना नदीवर दि १७ मे रविवार रोजी संपन्न झाला . यावेळी केंद्रातील सेवेकरी परिवारातील महिला व पुरुष सेवेकऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून नदी परिसराची स्वच्छता केली व नदिचे पवित्र्य जपण्याची, प्लाष्टिक व कचरा नदीत न टाकण्याची नदी प्रदुषण मुक्त ठेवण्या साठी सातत्याने प्रयत्न करण्याची प्रतिज्ञा घेण्यात आली . कार्यक्रमादरम्यान विधिवत नदी पुजण करून नदीचा मानसन्मान सेवा रुजू करण्यात आली पर्यावरण संवर्धन आणि समाज प्रबोधनाच्या दृष्टीने हा उपक्रम अत्यंत प्रेरणादायी ठरला

## वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाच्या वर्धापन दिनानिमित्त भव्य कार्यक्रम खरीप पिक परिसंवाद व कृषी प्रदर्शनाचे आयोजन

(गजानन चव्हाण/दै.धर्मयोध्दा)

**परभणी** - वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी यांच्या विस्तार शिक्षण संचालनालय व महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठाच्या ४८ व्या वर्धापन दिनानिमित्त ''खरीप पीक परिसंवाद व कृषी प्रदर्शन'' आयोजित करण्यात आले आहे. हा कार्यक्रम दि. १८ मे २०२६ रोजी सकाळी ११ वाजता स्वर्गीय जयंती दीक्षांत सभागृह, विद्यापीठ क्रीडा संकुल, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी येथे संपन्न होणार आहे. या परिसंवादाचे उद्घाटन महाराष्ट्र राज्याचे कृषिमंत्री मा. ना. श्री. दत्तात्रय भरणे यांच्या हस्ते होणार असून, विशेष अतिथी म्हणून राज्याच्या पालकमंत्री तथा सार्वजनिक आरोग्य, ऊर्जा, महिला व बालकल्याण मंत्री मा. ना. श्रीमती मेघना साकोरे-बोर्डीकर उपस्थित राहणार आहेत. तसेच वित्त, नियोजन, कृषी, मदत व पुनर्वसन मंत्री मा. ना. ॲड. आशीष जयस्वाल यांचीही प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू मा. प्रा. (डॉ.) इंद्र मणी राहणार आहेत. यावेळी विविध खासदार, आमदार, कृषी तज्ज्ञ, संशोधक व कृषी विभागातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित राहणार असून शेतकऱ्यांना आधुनिक शेती तंत्रज्ञान, खरीप पिकांचे व्यवस्थापन, उत्पादनवाढ आणि कृषी विषयक मार्गदर्शन करण्यात येणार आहे. या परिसंवादासोबत कृषी प्रदर्शनाचेही आयोजन करण्यात आले असून, आधुनिक कृषी अवजारे, नवीन बियाणे, शेतीपूरक तंत्रज्ञान व कृषी संशोधनाची माहिती शेतकऱ्यांना उपलब्ध करून देण्यात येणार आहे. मोठ्या संख्येने शेतकरी, विद्यार्थी व कृषी क्षेत्रातील नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## जालना जिल्ह्याची कन्या पूजा वायल हिची नासा शैक्षणिक कार्यक्रमासाठी निवड

**जालना** - जालना येथील प्रतिभावान विद्यार्थिनी पुजा वायल हिने जिल्ह्याचे तसेच देशाचे नाव अभिमानाने उज्वल केले आहे. उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर तिची प्रतिष्ठित NASA Educational Experience Program (USA) साठी निवड झाली आहे.

पूजा वायल हिला ISSC मध्ये उत्कृष्ट प्रदर्शनासाठी ''Best Performer '' हा सन्मान मिळाला. त्यानंतर अमेरिकेत आयोजित करण्यात येणाऱ्या नासाच्या विशेष शैक्षणिक अनुभव कार्यक्रमासाठी तिची निवड करण्यात आली. ही



उपलब्धी जालना जिल्ह्यासाठी अभिमानाची बाब ठरली आहे.

या कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांना NASA Space Center ला भेट देण्याची, विज्ञान आणि अंतराळ संशोधनाशी संबंधित विविध उपक्रमांमध्ये सहभागी होण्याची तसेच आधुनिक तंत्रज्ञान समजून घेण्याची संधी मिळणार आहे. विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन, नवकल्पना आणि अंतराळ विज्ञानाविषयी रुची निर्माण करणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

पूजा वायल यांच्या या यशाबद्दल कुटुंबीय, शिक्षक तसेच सामाजिक संस्थांनी आनंद व्यक्त करत तिच्या उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत. तिची ही कामगिरी इतर विद्यार्थ्यांनाही मोठी स्वप्ने पाहण्याची आणि ती पूर्ण करण्यासाठी प्रेरणा देणारी ठरेल.

''मेहनत आणि स्वप्नांची सांगडच यशाच्या उंच भरारीचे कारण ठरते.''

## जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था परभणी यांच्या मालकीच्या शासकीय जागेवरील अनाधिकृत अतिक्रमणे हटवली

(गजानन चव्हाण/दै.धर्मयोध्दा)

**परभणी** - महाराणा प्रताप चौक जिंतूर नाका जवळील जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था परभणी यांच्या मालकीच्या शासकीय जागेवरील अतिक्रमण हटविण्याबाबत परभणी शहर महानगरपालिकेने अंतिम नोटीस बजाऊण सदरील जागेवरील सर्व अतिक्रमणे जमीनदोस्त करून टाकली आहे. संबंधित जागेवर संरक्षक भिंत उभारण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. महानगरपालिकेच्या नगररचना विभागाने जारी केलेल्या पत्रानुसार, परभणी शहराच्या विकास योजनेत संबंधित सर्वे क्रमांक ६३५ मधील . दहा एकर पस्तीस गुंठे जागेवर






संरक्षण भिंतीचे बांधकाम सुरू आहे. केंद्र शासनाच्या सूचनेनुसार सदरील संस्थेत दहा एकर जागा आवश्यक आहे. जवळपास १८ गुंठे जागेवर टीन शेडचे दुकाने टपऱ्या व हॉटेल बरेच अतिक्रमणे होती पण ती अतिक्रमणे पोलीस फोर्स व महानगरपालिका यांच्या साह्याने पूर्ण जमीनदोस्त करण्यात आली आहेत.


संदर्भ पत्र एक नुसार सदरील जागेपैकी ४८०० चौरस मीटर जागा डीपी प्लॅन नुसार शॉपिंग सेंटर करिता आरक्षित आहे. ही बाब आज रोजी पर्यंत या कार्यालयास अवगत नव्हती तसेच सदरील जागा महानगरपालिका हस्तांतरित करण्याबाबत शासनाचा अथवा / आयुक्त शिक्षण कार्यालयाच्या संचालक एस सी ई आर टी पुणे यांच्या कोणत्याही सूचना नाहीत. संदर्भात भविष्यात शासन जो निर्णय घेईल तो या कार्यालयास मान्य असेल त्यानुसार शासनामार्फत मान्य जागा महानगरपालिका हस्तांतरित करण्यात येईल.

सदरील राज्य शासनाच्या कार्यालयाच्या जागेनुसार अतिक्रमणे काढून संरक्षण भिंतीचे बांधकाम सुरू आहे. दरम्यान, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य सुदर्शन चिटकुलवार यांनी महानगरपालिकेला पाठविलेल्या पत्रात, शासनाच्या धोरणानुसार शासकीय शैक्षणिक संकुलाच्या संरक्षणासाठी १० एकर ३५ गुंठे जागेवर संरक्षक भिंतीचे बांधकाम सुरू असल्याचे स्पष्ट केले आहे. केंद्र शासन निर्दर्शनास आले आहे. त्यामुळे शासकीय जमिनीचे संरक्षण व अतिक्रमण रोखण्यासाठी महापालिकेच्या पत्रात महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ अंतर्गत संबंधित तरतुदींचा उल्लेख करण्यात आला असून, नियमांचे पालन करून कारवाई करण्यात आली असून सदरील जागेवरील अतिक्रमणाचे धाबे दणाणले आहेत.

## तिरुपती मार्गे नांदेड- धर्मावरम साप्ताहिक एक्सप्रेस सुरू

(शेख असद/दै.धर्मयोध्दा)

**पुर्णा** - रेल्वे मंत्रालयाने नांदेड आणि आंध्र प्रदेशातील धर्मावरम यांच्यामध्ये तिरुपती मार्गे साप्ताहिक एक्सप्रेस गाडी चालविण्यास मंजुरी दिली आहे. गाडी क्रमांक १७६३५ / १७६३६ नांदेड धर्मावरम नांदेड ही आता विशेष गाडीऐवजी नियमित साप्ताहिक एक्सप्रेस म्हणून धावणार आहे. सध्या विशेष गाडी क्रमांक ०७१८९ / ०७१९० म्हणून चालवली जाणारी ही सेवा आता नियमित होत असल्याने प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे. विशेषतः तिरुपती, श्री कालहस्ती, ओंगोल, विजयवाडा, वारंगल, निजामाबाद आदी महत्वाच्या तीर्थक्षेत्रे व शहरांमध्ये जाणाऱ्या भाविक आणि प्रवाशांसाठी ही




गाडी उपयुक्त ठरणार आहे.

गाडीची सुरुवात व वेळापत्रक: गाडी क्र. १७६३६ (धर्मावरम नांदेड) : रविवार, १७ मे २०२६ रोजी सुटणार. गाडी क्र. १७६३५ (नांदेड धर्मावरम) : शुक्रवार, २२ मे २०२६ रोजी सुटणार.

प्रमुख थांबे (संक्षिप्त): नांदेड धर्मावरम (१७६३५) नांदेड (१६:४५) मुदखेड बासर निजामाबाद करीमनगर पेद्दपल्ली वारंगल महबुबाबाद खम्मम विजयवाडा ओंगोल नेल्लोर रेणिगुंटा तिरुपती कादिरी धर्मावरम (दुसऱ्या दिवशी १९:३०)

धर्मावरम नांदेड (१७६३६) धर्मावरम (०५:२५) कादिरी तिरुपती रेणिगुंटा नेल्लोर ओंगोल विजयवाडा खम्मम वारंगल निजामाबाद नांदेड (दुसऱ्या दिवशी ०८:०५) (सविस्तर वेळापत्रक व थांब्यांसाठी रेल्वे ॲप किंवा स्टेशनवर उपलब्ध वेळापत्रक पहा.) गाडीची रचना: ०२ एसी द्वितीय श्रेणी (२) ०६ एसी तृतीय श्रेणी (३) ०८ स्लीपर क्लास ०४ जनरल डब्बे एकूण २२ डब्बे या नवीन नियमित गाडीमुळे नांदेड विभागातील प्रवाशांना विश्वासार्ह व नियमित कनेक्शन उपलब्ध होणार असून, तिरुपती यात्रेसाठी विशेष सोय झाली आहे.

दैनिक धर्मयोध्दा हे पत्र मुद्रक, प्रकाशक व मालक शिंदे रामेश्वर गणपतराव यांनी प्रविण प्रिटींग प्रेस शॉप नं.१४ सुपर मार्केट, कारेगांव रोड, परभणी ४३१ ४०१ (महाराष्ट्र) येथे छापून धर्मयोध्दा कार्यालय, विकास नगर, कारेगांव रोड, परभणी ४३१ ४०१ (महाराष्ट्र) येथुन प्रसिध्द केले. **संपादक-शिंदे रामेश्वर गणपतराव**

DHARMA YODDHA Daily Publisher, Printer, Owner by- Shinde Rameshwar Ganpatrao, Printed at Pravin Printing press Shop No 14 Super Market Karegaon Road Parbhani 431401 (M.S) And Published Dharmayoddha Karyalaya Vikas Nagar,Karegaon Road Parbhani. 431401 (M.S) Editor By - Shinde Rameshwar Ganpatrao